९८५३
म. ग्रं. सं. ठाणें.
विषय काव्य
सं. क्र. २३५९



REFBK-0022510
REFBK-0022510

# अनुभूति

• शुकदास

विवेकानंद आश्रम
हिवरा बु. जि. बुलढाणा

# अनुभूति....

-शुकदास

(द्वितीय आवृत्ती)

REFBK-0022510

REFBK-0022510

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क.

विवेकानंद आश्रम, हिवरा बु.

जि. बुलढाणा.

प्रकाशक

**प्रकाशन विभाग**
विवेकानंद आश्रम,
हिवरा बु.

**द्वितीय आवृत्ती**

सर्व हक्क विवेकानंद आश्रम,
हिवरा बु. जि. बुलढाणा द्वारा सुरक्षित

मुद्रक

**यशवंतराव के. देशमुख**
**अरुणदत्त मुद्रण**
कॉटन मार्केट, नागपूर.

प्रस्तावना—

कशाला कोणाचा अभिप्राय घवू ।
उगीच मिरवू मोठेपण ॥१॥
दुसऱ्याचा माल फक्त हाताळला ।
समोर ठेविला भाविकांच्या ॥२॥
वस्तुस्थिती तुम्हा केली निवेदन ।
कर्तेपणातून मुक्त झालो ॥३॥
शुकदास म्हणे करुनि प्रार्थना ।
माझी प्रस्तावना संपवितो ॥४॥

...शुकदास

कार्तिक पौर्णिमा
१० नोव्हे. ७३

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
2368
दा. क्र. 22590
संदर्भ शाखा (स्थळ

# अनुभूति

विवेकानंद आश्रम, हिवरा बु. जि. बुलढाणा.

## प्रार्थना

(अभंग १ ते ६)

(१)

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरः ॥
गुरुःसाक्षात् परब्रह्म, तस्मै श्रीगुरवे नमः ॥
अखंडमंडलाकारं, व्याप्तं येन चराचरम् ॥
तत्पदं दर्शितं येन तस्मै श्री गुरुवे नमः ॥
स्थापकाय च धर्मस्य, सर्वधर्मस्वरूपिणे ॥
अवतार वरिष्ठाय रामकृष्णाय नमो नमः ॥

(२)

अनंत ब्रह्मांडे तुझा परिवार । कोठे बांधू घर तुज देवा ॥१॥
तुझ्यावीण रीते स्थळचि हे नाही । मूर्तिरूपे पाही कोठे स्थापू ॥२॥
तूंचि वस्तु आंत तूचि वस्तुरूपे । तोय पत्र पुष्पें कैसे वाहूं ॥३॥
शेष आणि वेद थकले वर्णिता । माझ्या मुखे आता काय वर्णू ॥४॥
काय सांगू देवा लाज वाटे मज । कळले हे गुज म्हणूनिया ॥५॥
शुकदास म्हणे असे हे असता । काय करूं आता समजेना ॥६॥

(३)

चितशुद्ध नाही मन ते चंचळ । करी तूं सांभाळ, देवा माझा ॥१॥
तुझ्या प्राप्तीसाठी नाही मी लायक । होऊनि नावीक तारी आता ॥२॥
कसे म्हणू देवा आहे मी शरण । कांहीच अर्पण केले नाही ॥३॥
नाही केली कधी तुझी आठवण । त्यामुळे कळून हक्क नाही ॥४॥
शुकदास म्हणे असो ते कसेही । परी ठाव देई स्वरूपांत ॥५॥

(४)

सर्वा ठायी तूचि परी अगोचर । होशील गोचर कोण्या यत्ने ॥१॥
त्यासाठी उपाय काय करू देवा । दिसशील केंव्हा राहवेना ॥२॥
अैसी कैशी जादू दिशाभूल झाली । असूनि जवळी भेट नाही ॥३॥
शुकदास म्हणे आभास काढूनि । दावी सर्वातूनि रूप तुझे ॥४॥

(५)

उबगलो आहे वेगळा राहून । स्वरूपी घेऊन जाई त्वरे ॥१॥
किती काळ राहूं देहाच्या सीमेंत । आता बंधनांत राहवेना ॥२॥
कशी आणि केंव्हा आली जीव दशा । हेचि जगदीशा समजेना ॥३॥
शुकदास म्हणे एकत्व पूर्वीचे । म्हणूनी अमुचे ऐक देवा ॥४॥

(६)

मागणे एकचि देवा तुझ्यापाशी । मलीन मनासी शुद्ध करी ॥१॥
सुखदु:खे माझी मीच भोगण्यास । समर्थ मनास करी देवा ॥२॥
सेवेत विलीन व्हावे माझे मन । अहंकारहीन नष्ट व्हावा ॥३॥
नित्य शुद्ध ठेवी माझे तनमन । कराया अर्पण तूज लागी ॥४॥
शुकदास म्हणे तुज ही फिकीर । न करी विचार तो मी देवा ॥५॥

(७)

संसार सागर तरावयासाठी । टाकी कृपादृष्टी देवराया ॥१॥
फिरूनी थकूनी आलो या स्थितीत । यापुढे हिम्मत नाही आता ॥२॥
नसे मी समर्थ जाण्या पैलतीरी । धरूनिया करी नेई देवा ॥३॥
शुकदास म्हणे दीनांच्या दयाळा । बोलावू कोणाला तुझ्यावीण ॥४॥

(८)

मीच एक पुत्र सर्व आई बाप । त्यामुळे अमाप सुख मला ॥१॥
असे भाग्यवान वीरळ असती । पुत्राद्वारे भक्ती जया घडे ॥२॥
सर्व कांही मिळे आईच मिळेना । असे बोलतांना दिसताती ॥३॥
शुकदास म्हणे आईविण कांही । दिसतच नाही मज दुजे ॥४॥

(९)

शेवटची घडी गोड होण्यासाठी । तुझी कृपादृष्टी आवश्यक ॥१॥
संपूर्ण जीवन ठेवीन निर्मल । राहीन अचल ध्येयमार्गी ॥२॥
वेळेवर येई धावूनि अनंता । जीवनाची होता सायंकाळ ॥३॥
शुकदास म्हणे अंतिम ती स्थिती । आहे तुझ्या हाती देवराया ॥४॥

(१०)

ईश्वराचा शोध व्यर्थ कां करिता । प्रत्यक्ष असता तुम्हा पुढे ॥१॥
बरे तुम्ही त्यासी कोठे शोधणार । तयावीण स्थळ नाही कोठे ॥२॥
आता तरी तुम्ही डोळे उघडूनि । पहा सर्वांतूनि ईश्वराला ॥३॥
शुकदास म्हणे सर्वांभूती देव । घेऊ अनुभव प्रत्यक्षांत ॥४॥

(११)

जीवदशा गेली झालो पूर्ववत । होतो मी स्वप्नांत आजवरी ॥१॥
माझ्याच चुकीने असता भ्रमात । फालतू चक्रांत सापडलो ॥२॥
बळेच आरोप घेतले लादूनि । फिरलो ह्या योनी व्यर्थपणें ॥३॥
शुकदास म्हणे आभास नासता । प्राप्त सुख आता प्रगटले ॥४॥

(१२)

जें कांही होतसे अवघे निर्माण । शेवटी नासून जात असे ॥१॥
मध्ये होत जात सर्व चराचर । परी ब्रह्म स्थीर जैसे तैसे ॥२॥
जैसे होते तैसे राहे सदोदित । असे अबाधित सर्व काळी ॥३॥
शुकदास म्हणे सर्वांस व्यापून । एकच असून बहू भासे ॥४॥

(१३)

सद्‌गुरु राया करी कृपा आता । ऐक दीननाथा हाक माझी ॥१॥
अविद्या कल्पने माझा मी चुकलो । भ्रमिष्ट बनलो काय करू ॥२॥
कल्पनेचे भूत लागलेसे पाठी । त्या संगे हिंपुटी झालो आता ॥३॥
शुकदास म्हणे दासावरी कृपा । करी मायबापा झडकरी ॥४॥

(१४)

आठविता तुझे नामरूप देवा । मिळतो विसावा क्षण भर ॥१॥
परंतु वाटते पुन्हा रुखरुख । न दिसशी सन्मुख म्हणूनिया ॥२॥
राहवेना आता बोलतो उघड । लागलेसे वेड मीलनाचे ॥३॥
शुकदास म्हणे झालो उतावीळ । नको लावू वेळ देवा आता ॥४॥

(१५)

प्रथमपासूनि अखेर पर्यंत । जीवन सेवेंत जावो माझे ॥१॥
हीच एक असे इच्छा मनातूनि । नको या वाचूनि अन्य मज ॥२॥
ईश्वर कृपेने आशा पूर्ण व्हावी । हाक ऐकू यावी दु:खितांची ॥३॥
शुकदास म्हणे दीनाचा दयाळ । करून घेईल सर्व कांही ॥४॥

(१३)

जीवाला भ्रमिष्ट करून भूलवी । करण्यास लावी भलतेच ॥१॥
त्यामुळे कितीक गुलाम बनले । फिरून राहिले भवचक्री ॥२॥
जीने हे निर्मीले संपूर्ण जगत । तीच फसवत जड जीवा ॥३॥
शुकदास म्हणे कांही माया पूत । करूनिया मात मुक्त झाले ॥४॥

(१७)

भक्ती सुखामध्ये मन ते रमले । तेणे विसरले विषयासी ॥१॥
देवापायी वेडे झाले माझे मन । गेले देहमान हारपूनी ॥२॥
भक्ती प्रेमापुढे सर्व तुच्छ वाटे । देवावीण कोठे करमेना ॥३॥
शुकदास म्हणे सुखाचा सुकाळ । नासे तळमळ भक्तीमुळे ॥४॥

(१८)

नष्ट होय माझा सर्व अभिमान । नगण्य राहीन असे करी ॥१॥
अनासक्तपणे जीवन जगावे । सर्व कर्म व्हावे तुझ्या साठी ॥२॥
शुकदास म्हणे यावीण अधिक । मागणे शिल्लक नाही देवा ॥३॥

(१९)

एकची ते ब्रह्म सर्वत्र नटले । मायेने भासले विपरीत ॥१॥
विपरीत दिसे रज्जू सर्पापरी । असोनिया दोरी भास झाला ॥२॥
भास झाला तोचि दिवे नाश केला । असत्य कळला सर्प मग ॥३॥
तैशारीती असे अवघेचि ब्रह्म । परी माया भ्रम झाला होता ॥४॥
झाला होता भ्रम ज्ञानदीप नेला । तो तेथे देखीला आत्माराम ॥५॥
शुकदास म्हणे नामरूपाअंती । निरसेल भ्रांती मायाकार्य ॥६॥

(२०)

सर्व नारी मज आईचे समान । नम्र होते मन पायी त्यांच्या ॥१॥
लेकरूं मानेना आईचा विटाळ । जी करी सांभाळ आत बाह्य ॥२॥
मातृभाव आणि मातृप्रेमामुळे । वाटते मोकळे निर्विकार ॥३॥
शुकदास म्हणे नाही शुद्धमन । भीतीने पळून गेले किती ॥४॥

(२१)

देवा मज द्यावी भेट । किती पाहू आता वाट ।।१।।
कासावीस जीव झाला । तुझ्यावीण दुःख मला ।।२।।
जरी आहे हीन दीन । कृपा करी झालो लीन ।।३।।
शुकदास म्हणे देवा । नित्य मज पायी ठेवा ।।४।।

(२२)

विश्वनाथा तुज आलो मी शरण । आहे हीन दीन कृपा करी ।।१।।
नको मला सुख न व्हावा लौकीक । राहीन सेवक सेवकाचा ।।२।।
शुकदास म्हणे माया मोहातून । काढी माझे मन पूर्णपणे ।।३।।

(२३)

सृष्टि निर्मात्याला पाहू शोधू चला । आताच तुम्हाला दाखवितो।।१।।
तो पाहा दिसतो छोटचाशा अणूंत । आहे हृदयांत प्रत्येकांच्या ।।२।।
तोचि सत्ताधारी सर्वाच्या शरीरी । नका कल्पू दूरी कोठेतरी।।३।।
शुकदास म्हणे कल्पना टाकूनि । पहा तो होऊनि अंतर्मुख ।।४।।

(२४)

देहाचि ही खोळ गळून पडावी । बंधने तुटावी नाना विध ।।१।।
देहांत राहून झाला कोंडमारा । करी सर्वेश्वरा मुक्त आता ।।२।।
शरीराचि निगा राखता राखता । विटलो अनंता खरोखर ।।३।।
शुकदास म्हणे दावी रूप तुझे । झाले आता ओझे शरीराचे ।।४।।

(२५)

तुज मी सोडूनी आलो किती दूर । आता हूरहूर वाटतसे ।।१।।
मायेच्या राज्यांत करमेना मला । कासावीस झाला जीव माझा।।२।।
पदोपदी येथे होते फसगत । आहे स्वप्नवत सर्व कांही ।।३।।
शुकदास म्हणे कसेही करूनी । त्वरीत येऊनी न्यावे मज ।।४।।

(२६)

आदि अंती होते एकचि व्यापक । नाम रूपात्मक तेचि मध्ये ॥१॥
जैसा तंतु पटी किंवा माती घटी । तैशी दिसे सृष्टी ब्रह्मरूप ॥२॥
काय सांगू चिह्न या वीण सूचेना । वेगळे दिसेना त्याच्याविना ॥३॥
शुकदास म्हणे गेले बदलून । संपूर्ण जीवन माझे आता ॥४॥

(२७)

मोठा तूं हुन्नरी असशी विचित्र । बाजार सर्वत्र भरवीला ॥१॥
बाजारांत तूचि ग्राहक मालक । वस्तू ह्या अनेक नटलासी ॥२॥
शुकदास म्हणे कळला प्रकार । म्हणूनि विचार मांडलासे ॥३॥

(२८)

अनंत ब्रह्मांडा खालते वरूते । तयाविण रीते स्थळ नाही ॥१॥
जिकडे पहावे तिकडे अपार । त्यांत सर्वेश्वर भरलासे ॥२॥
शुकदास म्हणे एकची अखंड । दिसते उघड दुजे नाही ॥३॥

(२९)

तूचि एक आहे माझे प्रेमस्थान । सर्वस्व अर्पण केले तुला ॥१॥
बाहूली प्रमाणे झाली माझी स्थिती । सर्व सूत्रे हाती देवा तुझ्या॥२॥
शुकदास म्हणे झालो मी निर्भय । तूचि कर्ता आहे म्हणूनिया ॥३॥

(३०)

ज्या मी देवाचा आहे उपासक । करूनी ओळख देतो त्याची ॥१॥
या इकडे तुम्ही पहा तो नयनी । नटला रूपांनी श्रमीकांच्या ॥२॥
गरीब अनाथ अपंग दलीत । रोगाने पीडीत अज्ञ रूपे ॥३॥
या दुःखे पीडीत श्रमीक देवाशी । राहूं उपवासी अन्न देऊ ॥४॥
शुकदास म्हणे पहा माझ्या देवा । करीतो मी सेवा मनोभावे ॥५॥

(३१)

असे एक आत्मा सर्वांचे शरीरी । नसे नरनारी भेद तेथे ॥१॥
पण देहासंगे भासे लिंग भेद । असता अभेद आत्माराम ॥२॥
शुकदास म्हणे आत्मा आत्मी नाही । भेदारोप पाही भ्रममय ॥३॥

(३२)

देवा मी तुझारे साधा भोळा भक्त । जोडोनिया हात नाम घेतो॥१॥
योगीक क्रीयेचे नाही मला ज्ञान । ग्रंथाचे वाचन केले नाही ॥२॥
नाही केले तीर्थे संत समागम । भक्ती भावे नाम घेत आलो ॥३॥
शुकदास म्हणे काय मागू देवा । फक्त लक्ष ठेवा दीनावरी ॥४॥

(३३)

दगडाचा देव तया केला ठाव । भजती मानव प्रेमभावे ॥१॥
भक्तही दगड देवही दगड । दिसतो उघड भ्रम तेथे ॥२॥
असे किती तरी कोटयावधी भक्त । दगडा भजत रात्रंदिन ॥३॥
शुकदास म्हणे कळेना मूर्खाशी । ब्रह्म एक देशी वाटे तया ॥४॥

(३४)

देवाची ही जात गोत पाहताती । जन्मला म्हणती व्यर्थपणे ॥१॥
देव तो असता अमर अजात । भक्तचि कल्पीत अशा रीती ॥२॥
देवाच्या विषयी चुकीच्या कल्पना । वाटे ऐकतांना लाज मनी ॥३॥
शुकदास म्हणे खऱ्या स्वरूपाची । ओळख देवाची झाली नाही ॥४॥

(३५)

जन्ममृत्यू नाही अशा त्या वस्तूला ।बाह्य शस्त्र भाला काय करे॥१॥
अग्नी तो जाळेना वारा सुकवीना । कोणाचे चालेना कांही तेथे ॥२॥
असे हे आपुले स्वरूप असता । मरणाचि चिंता व्यर्थपणे ॥३॥
शुकदास म्हणे विवेक करून । निर्भय होऊन राही आता ॥४॥

(३६)

लोकांचा स्वभाव वेश्येच्या प्रमाणे । चालूच ऐकणे कोणाचेहि ॥१॥
मते देव धर्म नित्य बदलती । त्यामुळे फजीती होत आहे ॥२॥
म्हणून असावे पतीव्रते समान । फक्त आत्माराम ओळखावा ॥३॥
शुकदास म्हणे आत्म्याव्यतिरिक्त । अनात्म वस्तूत गुंतू नये ॥४॥

(३७)

पाहिला कां देव दृश्यांत लपला । चला जाऊ चला पाहू त्यासीं ॥१॥
आताच प्रत्यक्ष पाहिला उघड । दृष्टीसृष्टी आड लपलासे ॥२॥
म्हणूनि तयासी चला आता पाहू । समरस होऊ एकत्त्वाने ॥३॥
शुकदास म्हणे पाहण्यास गेलो । आम्हीच लपलो दृष्टी आड ॥४॥

(३८)

दृष्टीला गोचर होणाऱ्या सृष्टींत । किंवा नाशिवंत वस्तू मध्ये ॥१॥
जे का अविनाशी शुद्धतत्व एक । अखंड व्यापक अनादीचे ॥२॥
अनादी काळाचे नाम रूपी व्याप्त । भासते जगत ज्याच्यामुळे ॥३॥
असे जे एकचि आधी मध्य अंती । त्यालाच म्हणती परब्रह्म ॥४॥
शुकदास म्हणे सृष्टीच्या बुडासी । तेच अविनाशी मूळ तत्व ॥५॥

(३९)

भक्ती मध्ये भक्ती आहे हीच खरी । जीवसेवा करी शीवभावे ॥१॥
भेद भावनेचा करूनिया त्याग । पाही सर्व जग स्वरूपांत ॥२॥
शुकदास म्हणे ज्ञानोत्तर भक्ती । हीच ते करती संत जन ॥३॥

(४०)

तुमच्या देवास पाहिजे नवस । आमुच्या देवास कांही नको ॥१॥
देणे घेणे जेथे न लागे कोणाला । त्या देवा भक्ताला पाहा तुम्ही ॥२॥
जो देव घेऊनी देतो नाशीवंत । आम्हाला शाश्वत सुख हवे ॥३॥
शुकदास म्हणे कामानिक भक्त । होऊनि वंचित दूर जाती ॥४॥

(४१)

समुद्राची वाफ वाफेमुळे ढग । दिसती निःसंग वेगळेचि ॥१॥
उष्णतेने झाले थंडीने विरले । थेंब थेंब आले भूमीवरी ॥२॥
भूमीस येऊन एकरूप झाले । सर्व ते चालले नदीकडे ॥३॥
नदीच्या ओघाने समुद्रांत गेले । अखंड संचले पूर्वरीती ॥४॥
शुकदास म्हणे दृष्टांताप्रमाणे । आदि अंत घेणे तैशा रीती ॥५॥

(४२)

निर्जीवाचेतन किंवा जीववीले । म्हणूनी पावले जीव नाम ॥१॥
आली जीवदशा अविद्येच्यामुळे । पिंडात व्यापले म्हणोनिया ॥२॥
मायेमुळे तेचि जीवनामा आले । उपाधीवेगळे शुद्ध मुक्त ॥३॥
शुकदास म्हणे असूनिया एक । भासते अनेक उपाधीने ॥४॥

(४३)

शुद्ध चित्तातील मानसीक पूजा । हेचि देवराजा मान्य असे ॥१॥
देह आणि मन असता मलीन । बाह्य पूजा स्नान निरर्थक ॥२॥
चित्ती तळमळ हवे भक्तीप्रेम । मग आत्माराम प्रगटेल ॥३॥
शुकदास म्हणे फिरूनिया आंत । शत्रूवर मात करा आधी ॥४॥

(४४)

विचार करूनी ठरवी उद्दिष्ट । ज्यामुळे शेवट गोड होय ॥१॥
नकोरे नको ते निर्ध्येय वर्तन । निष्फळ जीवन जात असे ॥२॥
ठरविल्या वीण करीता नमन । तसे ध्येयहीन माणसाचे ॥३॥
शुकदास म्हणे तैशा रीती असे । जोपर्यंत नसे ध्येय पुढे ॥४॥

(४५)

देव नाम मुखी घेता । नाशे सर्व भय चिंता ।।१।।
तोचि असे भाग्यवान । नाम जपे रात्रं-दिन ।।२।।
देव त्याचा पाठीराखा । काय वर्णू त्यांच्या सुखा ।।३।।
शुकदास सांगतसे । व्हावे देवासाठी पिसे ।।४।।

(४६)

अनादि अनंत असे हे सर्वही । नाशीवंत नाही काही येथे ।।१।।
जडाचे नेहमी होते रूपांतर । नित्य वेषांतर चैतन्याचे ।।२।।
शुकदास म्हणे होवोनिया व्यक्त । राहते अव्यक्त सर्वकाळ ।।३।।

(४७)

चालत्या बोलत्या देवाला सोडूनि । दगडा पुजोनि काय लाभ ।।१।।
जीवंत देवास फसवी लुबाडी । करतो दगडी देवपूजा ।।२।।
अचल देवाचे फिरते मंदीर । किती हे सुंदर दृश्य असे ।।३।।
शुकदास म्हणे डोळे तूं उघड । नशीबी दगड नाही तर ।।४।।

(४८)

जे मन बुद्धीस असे अगोचर । ज्याचा नेणे पार परा वाचा ।।१।।
परा वाचा नेणे शब्दातीत वस्तु । झाला वेदा अंतु वर्णाविया ।।२।।
असे जे कां आहे तेचि तूं असशी । पाहे आपणाशी परतोनि ।।३।।
शुकदास म्हणे गुरुकृपा झाली । ओळख पटली स्वरूपाची ।।४।।

(४९)

नको ध्येय सोडू प्राण गेला तरी । योग्य तेचि करी चिकाटीने ।।१।।
जरी गेले धन झाला अपमान । मित्रही सोडून गेले जरी ।।२।।
जग हे उठले कराया विरोध । तरी तू सावध ढळू नको ।।३।।
शुकदास म्हणे व्हावे निष्ठावंत । धरूनि हिम्मत पुढे यावे ।।४।।

(५०)

मीच देह आहे असा ज्याला भ्रम । त्याला आत्माराम कैसा भेटे ॥१॥
म्हणूनी हा भ्रम करा आधी दूर । व्यर्थ नाही तर फेरा पडे ॥२॥
सत्य स्वरूपांत होऊन जागृत । व्हावे बंधमुक्त लवकरी ॥३॥
शुकदास म्हणे अहं ब्रह्मास्मि । मंत्र रक्तमासी भिनवावा ॥४॥

(५१)

आत्म लाभासाठी धरी गुरूपद । घेई आत्मबोध गुरूमुखे ॥१॥
ब्रह्मरस ज्यांत असे ज्ञान होता । होईल तृप्तता ब्रह्मानंदे ॥२॥
शुकदास म्हणे असे झाल्यावर । त्या भाग्यापार काय वर्णू ॥३॥

(५२)

इंद्रिया जिंकूनी स्वरूपी रमावे । येतात आडवे नाहीतर ॥१॥
इंद्रियांच्या मागे जाऊ नये कधी । फक्त मन आधी आवरावे ॥२॥
निग्रह केल्याने करती बेजार । म्हणूनिया दूर राहा त्यांच्या ॥३॥
शुकदास म्हणे व्हावे अंतर्मुख । याविण आणीक नको कांही ॥४॥

(५३)

दत्त आंत रे ची कां भूललासी । आपणा नेणसी भ्रमामुळे ॥१॥
भ्रमामुळे तूंचि माहेरा चुकला । माहूरा चालला कोणासाठी ॥२॥
कोणासाठी जातो समजले मज । भ्रमे तुझा तुज पाहू जाशी ॥३॥
शुकदास म्हणे सावध सावध । पुन्हापुन्हा शोध स्वरूपाशी ॥४॥

(५४)

देवाने इंद्रिया बहिर्मुख केले । पाहती त्यामुळे बाह्य जग ॥१॥
म्हणून तयाशी परत फिरवा । अंतर्मुख ठेवा सर्वकाळ ॥२॥
तेंव्हा मग होय आत्मानुभूती । दिसे सर्वांभूती देव एक ॥३॥
शुकदास म्हणे अमृताचि प्राप्ती । अंतर्मुख होती होय त्यास ॥४॥

(५५)

उठी आत्मदेवा आधी लवकरी । प्रगट तू करी सामर्थ्याला ॥१॥
गेलेले साम्राज्य मिळवी आपुले । टाकी तू पाऊले पुढ पुढे ॥२॥
शुकदास म्हणे थांबू नको चाल । तेंव्हाच होईल ध्येयसिद्धी ॥३॥

(५६)

समस्त भूतें ही झाली ज्यापासून । शेवटी विलीन होती जेथे ॥१॥
ज्याच्या असण्याने सर्वांशी अस्तित्व । असे मूलतत्व कोण आहे ॥२॥
शुकदास म्हणे जगाचा आधार । तोचि सूत्रधार देव असे ॥३॥

(५७)

अती पुण्य होता वास स्वर्गलोकी । जाय तो नरकी पाप होता ॥१॥
पाप पुण्य सम होईल कदापी । मिळे पुनरपी नरदेह ॥२॥
शुकदास म्हणे होई यावेगळा । तरीच सोहळा स्वानंदाचा ॥३॥

(५८)

वैयक्तिक सुख स्वार्थी कर्मामुळे । शेवटी न मिळे शांती कोणा ॥१॥
जनसागरांत बुडवा स्वत्वाला । मग त्या सुखाला पार नाही ॥२॥
शुकदास म्हणे तुझे सुख सोड । मग नाही जड कांही येथे ॥३॥

(५९)

जन्मावे मरावे या नांव संसार । होय देहांतर तोचि मृत्यू ॥१॥
पापी समजणें मुळी पाप हेचि । कळे मी ब्रह्मचि पुण्योत्तम ॥२॥
शुकदास म्हणे घडे गर्भवास । यमपुरी त्यास म्हणो आम्ही ॥३॥

(६०)

ध्येय विकारांनी दुरावत असे । निकट येतसे विचारांनी ॥१॥
विचाराअभावी विकार वाढती । विकारे न येती सुविचार ॥२॥
म्हणून विकार करा आधी दूर । मग ध्येयतीर दूर नाही ॥३॥
शुकदास म्हणे विवेक विचार । करुनिया थोर मुक्त झाले ॥४॥

(६१)

नित्य सद्वस्तूचे करीता चिंतन । तद्रूप होऊन जाय मन ॥१॥
त्यामुळे मनाशी सामर्थ्य अपार । येतसे सत्वर पूर्वरीती ॥२॥
शुकदास म्हणे असाध्य ते कांही । राहतचि नाही जगामध्ये ॥३॥

(६२)

काय करू मी या संताचे वर्णन । ब्रह्मची सगुण साकारले ॥१॥
जगातील सारा भेद मिटविण्या । आले पटविण्या ब्रह्मऐक्य ॥२॥
शुकदास म्हणे वेळोवेळी येती । हेच ते करती काम पूर्ण ॥३॥

(६३)

पाण्यांत असूनी विसर पडला । अस्तित्व तयाला ज्याच्यामुळे ॥१॥
त्याची ती जाणीव असेना माशाला । भ्रमाने वेगळा कल्पीतसे ॥२॥
तशीच बनली अवस्था आपुली । दिशाभूल झाली अविद्येने ॥३॥
शुकदास म्हणे वाटते नवल । लक्षांत येईल कधी यांच्या ॥४॥

(६४)

विषयाचा त्याग करूनि आपण । जाऊ या शरण साधुसंता ॥१॥
तेंव्हाच ते मग सांगतील ज्ञान । होईल कल्याण जीवनाचे ॥२॥
शुकदास म्हणे संतकृपेमुळे । पापीही तरले असंख्यात ॥३॥

(६६)

डोळ्याला दिसते दूरून चांगले । आंतून भरले दुःख सारे ॥१॥
म्हणूनि अलिप्त राहून बघावे । सुख मिळवावे जगातील ॥२॥
आंत शिरताची फजीत पावत । असंख्य बंदिस्त होती त्यांत ॥३॥
जवळूनि होई बंधनकारक । हे सुखदायक दुरूनिया ॥४॥
शुकदास म्हणे तुम्ही फसू नका । बघ्याची भूमिका स्वीकारावी ॥५॥

(६७)

मोहनिद्रेतून होऊन जागृत । विचार मनांत करी जरा ॥१॥
सर्व शक्तीमान रूप तुझे मित्रा । मोहामुळे भित्रा बनलासी ॥२॥
नसे तू अज्ञान सर्वज्ञ असशी । व्यर्थ भूललाशी स्वरूपाला ॥३॥
शुकदास म्हणे मोह जाळातून । बाहेर पडून मुक्त होई ॥४॥

(६८)

ईश्वरापासून आपण विभक्त । असे जे वाटत भ्रमामुळे ॥१॥
तो भ्रम काढून भक्त होण्यासाठी । करती शेवटी जो प्रयत्न ॥२॥
शुकदास म्हणे त्यालाच म्हणती । खऱ्या अर्थी भक्ती शास्त्रामध्ये॥३॥

(६९)

आताच्या संताचे करीता वर्णन । नटाचे स्मरण होत असे ॥१॥
होत असे त्यास देखता समोर । वाटे गधी-वर प्रगटला ॥२॥
प्रगटला जैसा वृषभ पोळचाचा । गंध वैराग्याचा नसे त्यासी ॥३॥
नसे त्यासी लाज श्वानापरी भुंके । झेलतसे थुंकी धनासाठी ॥४॥
शुकदास म्हणे असे महाराज । कोटचावधी आज हिंडताती ॥५॥

(७०)

अंतरी वासना समूळ नासली । त्याची स्थिरावली मनबुद्धी ॥१॥
मनबुद्धी होता आत्मानंदी लीन । मग कैसे ध्यान विषयांचे ॥२॥
विषय तो त्यांचा होई नारायण । मग काय न्यून तया लागी ॥३॥
शुकदास म्हणे निज ध्यास करा । विषयासीं थारा देऊ नका ॥४॥

(७१)

वेदांताच्या गप्पा करता येतील । पण खटकेल कृतीवीण ॥१॥
नसे श्रद्धा भक्ती विधी नेम काही । स्वैरपणे राही सर्वकाळ ॥२॥
अशा पद्धतीने न होय सुटका । हा तर लटका परमार्थ ॥३॥
शुकदास म्हणे मार्गच चुकला । त्यामुळे हुकला क्रम सारा ॥४॥

(७२)

आत्मबोधावीण देह त्याग केला। पुन्हा त्या जीवाला जन्ममृत्यु ॥१॥
करावया दूर जरामृत्युव्याधी । आत्मज्ञान आधी मिळवावे ॥२॥
शुकदास म्हणे याच जीवनांत । आत्मतत्व प्राप्त होत असे ॥३॥

(७३)

आता तरी तुम्ही होऊनि सावध । घ्यावा आत्मबोध गुरुमुखे ॥१॥
पाशवी जीवन जगलो आपण । त्यामुळे पतन झाले होते ॥२॥
आता तरी येऊ पूर्वस्थितीवरी । चुकेल ही फेरी चौऱ्यांशीची ॥३॥
शुकदास म्हणे वेळीच निघोनी । जाऊ परतोनी नीजधामी ॥४॥

(७४)

वीरत्व उत्साह मित्र हो टाकूनि । व्यर्थची रडूनी काय लाभ ॥१॥
जग हे नाहीच भित्र्या लोकासाठी । म्हणूनि शेवटी उठा आता ॥२॥
गेलेला विश्वास परत मिळवा । जगाला दाखवा पुरुषार्थ ॥३॥
शुकदास म्हणे निर्भय होऊन । संपवा जीवन हंसतचि ॥४॥

(७५)

शाब्दिक ज्ञानाने नये अनुभूति । सद्‌गुरू करती म्हणूनीया ॥१॥
नाही तर मग शास्त्रच वाचूनी । जाते हे तरोनी सर्व लोक ॥२॥
पण ही किमया असे हो वेगळी । गुरूवीण किल्ली सांपडेना ॥३॥
शुकदास म्हणे अनुभवासाठी । गुरूला शेवटी नम्र व्हावे ॥४॥

(७६)

अमृततत्वाचा अनुभव येता । नासे भय चिंता सर्व काही ॥१॥
सर्व सुखे होती मग तृणवत । आत्मानंद प्राप्त झाल्यावरी ॥२॥
शुकदास म्हणे आत्म्या व्यतिरिक्त । सर्व नाशीवंत दिसतसे ॥३॥

(७७)

ज्ञानामध्ये ज्ञान मुख्य आत्मज्ञान । त्याविण बंधन अविद्येचे ॥१॥
विद्येने अविद्या समूळ नाशेल । प्रश्नच मिटेल बंधनाचा ॥२॥
परंतु ती विद्या आत्मविद्या हवी । नित्यमुक्त ठेवी साधकाला ॥३॥
शुकदास म्हणे आत्मज्ञानाविण । बाकीचे अज्ञान सर्व कांही ॥४॥

(७८)

श्वानापरी नको जीवन मरण । करावे नवीन कांही तरी ॥१॥
पाहुण्यासारखे आपुले राहणें । उगीच बंधने कशासाठी ॥२॥
असंख्यात गेले या जागी येऊनी । नांव ना निशाणी कांही त्यांची॥३॥
शुकदास म्हणे जग धर्मशाळा । प्रवासी जीवाला जावे लागे ॥४॥

(७९)

असावे वेगळे भासावे वेगळे । साधावे आपुले हित सदा ॥१॥
प्रत्येकाला माझे बोलणे पटेल । सावध होतील जाणोनिया ॥२॥
परी मात्र एक शेवटी होईल । सत्य प्रगटेल केंव्हा तरी ॥३॥
शुकदास म्हणे निराळे राहून । पाहावे करून कांही तरी ॥४॥

(८०)

थोडे बोले जरी कोणी ब्रह्मनिष्ठ । परी असे श्रेष्ठ वाणी त्यांची ॥१॥
एक एक शब्द श्रुतीचे प्रमाण । निघतो आंतून अनुभव ॥२॥
धावतो तयांच्या शब्दामागे अर्थ। की ज्याचा भावार्थ ध्यानी नये॥३॥
शुकदास म्हणे त्यांचे स्वाभाविक । परंतु तार्कीक मौनावती ॥४॥

(८१)

विवेक करूनी टाका काममद । सोडा सोडा छंद विषयाचा ॥१॥
विषय भोगीता होती रोग नाना । अंती त्या यातना वेगळ्याची॥२॥
विषय वासना मलीन बनवी । बळेच भोगवी सुखदु:ख ॥३॥
शुकदास म्हणे जीव दशा तीने । म्हणूनी त्यागणे त्वरीतची ॥४॥

(८२)

अध्यात्म म्हणज नव्हे पोरखेळ । सर्वस्व त्यागाल तेंव्हा कळे ॥१॥
वेदान्ताच्या गप्पा करूं नये कोणी । जोवर करणी कांही नाही ॥२॥
जसेच्या तसेच राहून आपण । दुसऱ्या सांगून काय लाभ ॥३॥
शुकदास म्हणे केल्याविण कांही । उपयोग नाही बोलण्याचा ॥४॥

(८३)

आत्मानुभूति हाचि एक धर्म । जाणती हे वर्म विरळची ॥१॥
धर्म नांवाखाली रूढीचे जुंबाड । वाढले उघड दिसताहे ॥२॥
कालपरत्वे ह्या रूढी बदलती । अधर्म म्हणती अज्ञ तया ॥३॥
शुकदास म्हणे धर्म हा बुडेना । किंवा बदलेना कदा काळी ॥४॥

[८४]

क्रोधामुळे प्रीती नष्ट होत असे । लीनता ती नाशे अभिमाने ॥१॥
कपटी स्वभाव मित्र दूर करी । लोभ नाशकारी सर्वस्वाचा ॥२॥
कामानीक वृत्ती करी पशुवत । होय आकुंचित मनबुद्धी । ३॥
संशयी स्वभाव विकल्पी बनवी । त्यामुळें दुरावी लोकमत ॥४॥
शुकदास म्हणे निष्काम होऊन । करा आचरण निर्विकल्पे ॥५॥

[८५]

प्रथम आपण पोहणे शिकावे । मग लोका न्यावे पैलतीरी ॥१।
नाही तर लोका खोटे सांगशील । धोका करशील मग तेथे ॥२॥
जैसा दिव्याखाली असे अंधःकार । प्रभा दूरवर काय कामी ॥३॥
शुकदास म्हणे होई मुक्त आधी । मग लोका बोधी आत्मज्ञान ॥४॥

[८६]

सर्वांनी करावे देवाचे भजन । सकाळी उठून नियमाने ॥१॥
किती ते प्रसन्न वाटते मनाला । उत्साह स्फूर्तीला वाण नाही ॥२॥
पहा तुम्ही सर्व प्रयोग करूनी । लागून भजनी ईश्वराच्या ॥३॥
शुकदास म्हणे सोपा हा उपाय । करी सुखमय जीवनाला ॥४॥

[८७]

स्वैर वर्तनाची लागली लालूच । त्यामुळे कोठेच करमेना ॥१॥
वेडावले मन खोटेच हंसतो । नकली बोलतो लोकांसाठी ॥२॥
अबूज लागते विलासी वृत्तीला । म्हणूनी धर्माला दोष देई ॥३॥
शुकदास म्हणे विटून येशील । मग करशील सर्व काही ॥४॥

[८८]

आत्मानंदी मन लीन झाल्यावरी । बाह्य दुःखे सारी दूर होती ॥१॥
दुःखाचे सुखांत होते रूपांतर । आतूनी बाहेर आनंदची ॥२॥
वज्रापरी मन होते मजबूत । होवोत आघात प्रकृतीचे ॥३॥
शुकदास म्हणे सुख दुःखातीत । होय स्थिती प्राप्त पुढे पुढे ॥४॥

[८९]

इंद्रियांचे द्वारा घेता अनुभव । आत्मा सावयव भासतसे ॥१॥
उपाधी रहीत पाहिला असता । तोचि वाटे होता परब्रह्म ॥२॥
मनाद्वारे तोचि विकारी भासत । एकाच पिंडात भेद ऐसे ॥३॥
शुकदास म्हणे अभेद असून । तो उपाधीतून भ्रमवीत ॥४॥

[९०]

अव्यक्त स्वरूपी वृत्ती स्थीर होता । ध्येय ध्यान ध्याता नष्ट होय ॥१॥
वृत्ती ती निवृत्त मन ते उन्मन । भोग्य भोक्ता जाण मग कैचे ॥२॥
शुकदास म्हणे होता आत्मज्ञान । नाहीच होऊन राहशील ॥३॥

(९१)

मनन ध्यानाने सर्व दोष जाती । पुढे ध्येय प्राप्ती होत असे ॥१॥
होत असे जैसा अग्नीसंगे काष्ठ । तैसाच शेवट होय ध्यानी ॥२॥
शुकदास म्हणे सांगतो म्हणूनि । स्वरूप चिंतनी मुक्त व्हाल ॥३॥

(९२)

आपणापासून करावा प्रारंभ । होई मग शुभ सर्व कार्य ॥१॥
पाहू नये दोष दुसऱ्याचे कधी । अंतर्मुख आधी व्हावे सदा ॥२॥
करणी वाचूनि नको बडबड । नित्य येती आड तेणे विघ्न ॥३॥
शुकदास म्हणे निःशंक होऊनि । मरावे करूनी सेवाकाम ॥४॥

(९३)

बोलू नये अती थोडेच ऐकावे । कृतीत आणावे भरपूर ॥१॥
येते मग तेंव्हा शब्दामागे शक्ति । बोलताच होती सर्व कामे ॥२॥
अशक्य वाटेना करतांना काही । समाधान राही सर्व काळ ॥३॥
शुकदास म्हणे यशाची किमया । कृतीविण वाया जात असे ॥४॥

(९४)

ऐकून घेण्याची असू द्या संवय । फार बोलू नये निरर्थक ॥१॥
काहीही बकावे ऊगीच्या ऊगीच । त्यापेक्षा मौनच बरे असे ॥२॥
बोला पण थोडे रसाळ मधूर । सुखवा अंतर दूसऱ्याचे ॥३॥
शुकदास म्हणे मोजके बोलून । शब्द सांभाळून वापरावे ॥४॥

(९५)

नका करू त्याग भोगू नका काही । सोपा मार्ग नाही याविण हो ॥१॥
अनासक्त व्हावे तेंव्हा मिळे मुक्ती । नंतर तुटती सर्व व्याधी ॥२॥
मुक्तीपूर्व त्याग वैताग असतो । कर्मानेच होतो कर्ममुक्त ॥३॥
शुकदास म्हणे विचार करूनि । शंका मनातूनि घालवावी ॥४॥

(९६)

चारित्र्याला खूप जपूनी आपण । आदर्श जीवन बनवावे ॥१॥
शीलभ्रष्ट व्यक्ति होतसे दुर्बल । पतीत कंगाल पुढे पुढे ॥२॥
चारित्र्य पावित्र्य असल्याशिवाय । राहेना निर्भय कोणी येथे ॥३॥
शुकदास म्हणे व्हावे शीलवंत । मग या जगात धोका नाही ॥४॥

(९७)

विद्या ती अविद्या ब्रह्मविद्येवीण । कारण अज्ञान स्वरूपाचे ॥१॥
इतर विद्येने स्वरूप जागृती । न होता पडती बंधनात ॥२॥
विविध ह्या विद्या भोगी बनविती। भोगा त्यागवी ती आत्मविद्या॥३॥
शुकदास म्हणे विद्यार्थी होऊन । विद्या संपादन करावी ही ॥४॥

(९८)

केली अंदाधुंदी विषय भोगीता। रडूनिया आता काय लाभ ॥१॥
सृष्टीचा नियम अती तेथे माती। दुःखभोगा अंती प्राप्त होय ॥२॥
शिक्षा करी देव नियम मोडीता । संयम ठेविता सुख मीळे ॥३॥
शुकदास म्हणे आता तरी ऊठ । शेवटी शेवट गोड करी ॥४॥

(९९)

थोरांचे जीवन मार्ग दाखवीत । म्हणूनी चरित्र पहा त्यांचे ॥१॥
त्यांच्या जीवनाचा करिता अभ्यास। मीळे आपणास योग्य दिशा॥२॥
थोरांचे विचार थोर बनविती । म्हणूनी सांगती रहा त्याच्या ॥३॥
शुकदास म्हणे तयाचे जीवन । साधका साधन होत असे ॥४॥

(१००)

उतावीळपणा करी विस्कळीत । शेवटी फजीत व्हावे लागे ॥१॥
त्यासाठी मनाची स्थिरता असावी । पाऊले टाकावी मग पुढे ॥२॥
रजतम करी वृत्तीला चंचल । ठेवितो निश्चळ सत्वगुण ॥३॥
शुकदास म्हणे करूनिया घाई । काहीच न होई उपयोग ॥४॥

(१०१)

दुसऱ्याचे दोष कशाला पाहावे । सरळ चालावे पुढे पुढे ॥१॥
आपण देखील दोषमुक्त नाही । म्हणूनिया काही बोलू नये ॥२॥
वाढतो विक्षेप निंदा केल्यामुळे । अशुद्ध आपले मन बने ॥६॥
शुकदास म्हणे निर्मळ होऊनी । गुणच पाहूनी गुणी व्हावे ॥४॥

(१०२)

शब्द शब्दातीत दाखवीत असे । शेवटी होतसे शब्दा अंत ॥१॥
शेषही थकला वेद मौनावले । श्रुतीने म्हटले नेती नेती ॥२॥
चार वाचा जेथे अनिर्वाच्य होती । त्रिपुट समाप्ती झाली जेथे ॥३॥
शुकदास म्हणे येता अनुभव । मीटे भेदभाव साधकाचा ॥४॥

(१०३)

ज्यावेळी धर्माला येते अवकळा । नीति नियमाला स्थान नसे ॥१॥
तेंव्हा कोणीतरी येऊन सत्वर । करी बरोबर पूर्ववत ॥२॥
पूर्वीपासून असे होत आले । व्यवस्थित झाले वेळोवेळी ॥३॥
शुकदास म्हणे त्याची ती तुम्हाला । पाहिजे कशाला उठाठेंव ॥४॥

(१०४)

कसे हो तुम्हाला अजूनि कळेना । टाका त्या कल्पना आतातरी ॥१॥
लोक हंसतील असे वागतांना । थोडी सुधारणा करा काही ॥२॥
काळाच्या ओघात बदल घडती । किती तरी होती फेरफार ॥३॥
शुकदास म्हणे त्यामुळे आपण । देऊया टाकून मिथ्या रूढी ॥४॥

(१०५)

भित्रे लोक सदा सशस्त्र असती । भीऊन करती प्रतिकार ॥१॥
प्रसंगी पळून जातील माघारी । वृत्ती अत्याचारी म्हणूनीया ॥२॥
निर्भय मनुष्य निर्भय राहिल । त्याची न वाटे भिती कोणा ॥३॥
शुकदास म्हणे निर्भयतेसाठी । अहिंसेच्या पोटी जन्म घ्यावा ॥४॥

(१०६)

आजच्या जगाचे करा निरीक्षण । येईल दिसून न्यून काय ॥१॥
भौतीक सुखाची साधने पुष्कळ । असता कल्लोळ चाललासे ॥२॥
तुम्हीच हे सांगा आहे का समता । कोठे नीतिमत्ता राहलीसे ॥३॥
शुकदास म्हणे देव धर्माविण । दूषीत होऊन गेले सर्व ॥४॥

(१०७)

जन्मल्यानंतर मरून पाहिले । असे कोणी केले सांगा तुम्ही ॥१॥
त्यामुळे शेवटी मरावे लागेल । कल्पना देखील नाही कोणा ॥२॥
मरण अटळ माहीत असून । झोपेत अजून कसे तुम्ही ॥३॥
शुकदास म्हणे मरून मरती । त्यांना नाही भिती मरणाची ॥४॥

(१०८)

आपल्या देशांत घरोघरी संत । किती तरी त्यांत सोंगीढोंगी ॥१॥
त्यातील बरेच नाना वेषधारी । काही ब्रह्मचारी असतील ॥२॥
फक्त नामधारी अनेक असती । म्हणवून घेती असंख्यात ॥३॥
शुकदास म्हणे नसे काही कृती । लोकांना करती उपदेश ॥४॥

(१०९)

नमूनी आदरे सर्वात्म देवासी । अर्पिले सेवेसी सर्वस्वाला ॥१॥
जीवन संपूर्ण सेवेत वेचीन । जीवन जगीन निष्कलंक ॥२॥
शुकदास म्हणे यावीण अधिक । दूसरे ठाऊक नाही मज ॥३॥

(११०)

जागृत करण्या सामान्य जनता । तरुणांनो आता उठा उठा ॥१॥
बहूसंख्य लोक असता अज्ञानी । तुम्ही हे पाहूनी शांत कैसे ॥२॥
मित्रहो पुढे या कसूनी कंबर । करूनी विचार झटू सारे ॥३॥
शुकदास म्हणे सांगतो एकचि । सेवा करण्याची संधी आली ॥४॥

(१११)

निद्रीत जीवांना करुनि जागृत । देऊनि मदत पुढे नेऊ ॥१॥
खऱ्या स्वरूपाची ओळख पटेल । जागृत होतील जीव सारे ॥२॥
प्रत्येकांला तुम्ही सांगा तत्वमसी । जाईल लयासी दुर्बलता ॥३॥
शुकदास म्हणे हाक द्या, संधी द्या । परत होऊ द्या मुक्त त्यांना ॥४॥

(११२)

पोटामागे पाय, पाया मागे डोके । त्याचे सर्व चुके जीवनांत ॥१॥
डोक्यामागे पाय, पाया मागे पोट । तयाचा शेवट गोड होई ॥२॥
शुकदास म्हणे नवल वाटेल । तुम्हास कळेल अनुभवे ॥३॥

(११३)

भ्रमाचा पडदा सारूनी बाजूला । फिरवा दृष्टीला सृष्टीमध्ये ॥१॥
दिसेल तुम्हाला देव सर्वाभूती । द्वैताची समाप्ती होत आहे ॥२॥
अथांग अशा त्या सुख सागरांत । असू बिंदुवत कुठे तरी ॥३॥
शुकदास म्हणे फळी फोडोनिया । भेदाची दुनिया टाकू मागे ॥४॥

(११४)

गरीब लोकांची पाहूनिया दैना । येते कां करुणा तुम्हालागी ॥१॥
डोळ्यांतील त्यांचे अश्रू पुसण्यास । केला का सायास कोणीतरी ॥२॥
प्रेतकळा त्यांची पाहूनी नयनी । आले का भरूनी नेत्र कधी ॥३॥
शुकदास म्हणे दीन दुबळ्यांना । जवळ कराना आता तरी ॥४॥

(११५)

गोकुळासारखे होते पूर्वी खेडे । आता सगळीकडे भेसूरता ॥१॥
दुःख दैन्य आले समृद्धता गेली । अज्ञाने पिडली लोकमने ॥२॥
सौंदर्य लोपले आली प्रेमकळा । किती अवकळा होत आहे ॥३॥
उत्साह संपला निष्क्रीय दिसती । बळेच करीती हालचाल ॥४॥
शुकदास म्हणे एका देवावीण । बनले स्मशान गोकुळाचे ॥५॥

(११६)

काम करण्याचा आलासे कंटाळा । म्हणूनी बनला साधुबाबा ॥१॥
पोटासाठी जटा दाढी वाढवीली । गळ्यांत घातली माळ मोठी ॥२॥
करून घेतले कपडे भगवे । कपाळी आडवे भस्म लावी ॥३॥
शुकदास म्हणे पोटासाठी लेका । फसवितो लोका मूर्खपणे ॥४॥

(११७)

मित्रांनो तुम्हीही खाली ओढू नका । त्यागाची पताका उंच करा॥१॥
त्याग नाही जेथे तेथे येई भोग । भोगरूपी रोग नाश करी ॥२॥
त्यागाच्या भूमीत त्यागी वृत्ती हवी । भूमीच त्यागावी नाही तर॥३॥
शुकदास म्हणे त्याग सर्वस्वाचा । स्वधर्म आमुचा असे हाच ॥४॥

(११८)

तन्मय होऊनि करावे चिंतन । नकली टाकून द्यावे सर्व ॥१॥
जरी केले ध्यान आसन घालूनी । घेतले मिटोनी डोळे सुद्धा ॥२॥
तरी काय लाभ मन ते अस्थिर । चालले विचार भलतेचि ॥३॥
शुकदास म्हणे एक क्षणभर । पाडावा विसर संसाराचा ॥४॥

(११९)

करूं नको असे वेडया-वाणी आता । शरण अनंता जाई त्वरे ॥१॥
सुखामध्ये गेले दिवस निघून । आले वृद्धपण दुःखमय ॥२॥
क्षीण झाल्या शक्ती कांहीच सूचेना । मन हे रमेना कशातचि ॥३॥
शुकदास म्हणे सोडून आसक्ती । आता तरी भक्ती करूं लाग ॥४॥

(१२०)

मीठ हे जोवरी मीठाच्या रूपांत । तोवरी हातात घेता येई ॥१॥
तेचि सागरात नेऊन टाकले । तद्रूप बनले अमर्याद ॥२॥
आता त्यामधूनी काढणें कठीण । झाले ते विलीन म्हणूनिया ॥३॥
शुकदास म्हणे होते एकदेशी । मिळता सिंधुसी सांपडेना ॥४॥

(१२१)

बाह्य लक्षणाचा काय उपयोग । करून प्रयोग पहा तुम्ही ॥१॥
न राहे साधना त्यामुळे अडून । मग भासवून काय लाभ ॥२॥
पण आपलीच होते दिशाभूल । असे जाणवेल पुढेपुढे ॥३॥
शुकदास म्हणे कृति तशी ठेवा । बाहेर देखावा कशासाठी ॥४॥

(१२२)

अनेक साधने करून पाहिली । मते अभ्यासली बहूविध ॥१॥
शाब्दिक ज्ञानाचे गोदाम भरले । वादांत जिंकले असंख्यात ॥२॥
परी काय लाभ अनुभव नाही । म्हणून सर्वही वाया गेले ॥३॥
शुकदास म्हणे जवळी अहंता । असूनी विद्वत्ता काय कामी ॥४॥

(१२३)

एका शब्दाहून तुज ओळखले । मनांत चालले काय तुझ्या ॥१॥
काय तुझे गोड वाटती उच्चार । परंतु विचार नाही तैसे ॥२॥
उच्चार पद्धती दीसते वेगळी । त्यांत साठविली मऊ शब्दे ॥३॥
शुकदास म्हणे आचारविचार । पाहिजे उच्चार सारखेचि ॥४॥

(१२४)

पाहूनि तुमचा हेकड स्वभाव । दिसतो अभाव नम्रतेचा ॥१॥
विद्वतेशिवाय धनमानसत्ता । वाढवी अहंता सदोदित ॥२॥
हृदय मेंदूचा करूनी वापर । ताबा मनावर असू द्यावा ॥३॥
शुकदास म्हणे अभिमान सोड । मग अवघड नसे कांही ॥४॥

(१२५)

तुझ्या मनातील समजले मला । करशी कशाला सोंगढोंग ॥१॥
नाही मनी श्रद्धा, चित्ती तळमळ । आतूनि गोंधळ चाललासे ॥२॥
संयम नियम सांगशी लोकाला । ईकडे सगळा स्वैराचार ॥३॥
शुकदास म्हणे भक्तीवीण गोष्टी । करून शेवटी काय लाभ ॥४॥

(१२६)

उत्कर्ष कोणाचा न होय सहन । मनी रात्रंदिन जळतसे ॥१॥
म्हणून खोट्याच गोष्टीचा विचार । करून प्रचार सुख मानी ॥२॥
चांगलेपणाचा बुरखा घेऊनी । करतो आतूनि पाप सारे ॥३॥
शुकदास म्हणे सर्वांच्या सुखात । मानीतसे हित तोचि ज्ञानी ॥४॥

(१२७)

हाताने फजिती करून घेतली । उपाधी लागली पाठीमागे ॥१॥
कळूनदेखील केला मूर्खपणा । करून वल्गना काय आता ॥२॥
चुकल्याशिवाय समजेना काही । पुन्हा करू नाही असे कधी ॥३॥
शुकदास म्हणे झाल्यागेल्यावर । करशी विचार व्यर्थपणे ॥४॥

(१२८)

आग लागलीसे आंतून मनाला । अंग हे कशाला भीजविशी ॥१॥
बाह्य पूजापाठ मुखी रामनाम । आता क्रोधकाम सतावीती ॥२॥
गळ्यामध्ये माळ कपाळीचंदन । करितो वाचन नियमाने ॥३॥
शुकदास म्हणे मन बिघडले । वरून चालले उपचार ॥४॥

(१२९)

तरुण असून उठवेना तुला । वाटेना मनाला लाज कशी ॥१॥
दुबळे रोगट दिसते शरीर । हास्य मुखावर नसे कधी ॥२॥
आपण होऊन कांही करण्यास । असेना विश्वास मनामध्ये ॥३॥
शुकदास म्हणे दिसतो तरुण । आंतूनि मरूनि गेला असे ॥४॥

(१३०)

प्रार्थनेच्या किती येतसे कंटाळा । वाटेना मनाला लाज काही ॥१॥
कॅरम गंजीफा खेळण्या उल्हास । गप्पा मारण्यास वेळ मीळे ॥२॥
आगाऊ फालतू करे भानगडी । हिंडे घडोघडी गावामध्ये ॥३॥
शुकदास म्हणे रिकामा असून । सांगतो कारण काही तरी ॥४॥

(१३१)

किती उलाढाली करून पाहसी । मुंडके मोडसी गरीबांचे ॥१॥
इतके करूनी फिकीर मिटेना । सुखाने लागेना झोप कधी ॥२॥
सर्वही असूनी समाधान नाही । तगमग कांही गेली नसे ॥३॥
शुकदास म्हणे चुकीच्या मार्गाने । कोणी सुखी होणे शक्य नाही ॥४॥

(१३२)

संपूर्ण जीवन गेले संसारात । पाप करण्यांत किती तरी ॥१॥
आता तूं पाहसी करूनी भजन । समय निघून गेल्यावरी ॥२॥
वेळीच सावध होऊन करावे । तेव्हाच आठवे मरतांना ॥३॥
शुकदास म्हणे संधी गमावली । क्षणिक मामूली सुखासाठी ॥४॥

(१३३)

असे कसे तुम्ही काही बी बोलता । आणि म्हणवीता देवधर्मी ॥१॥
पाहून आपल्या स्वैर वर्तनाला । होतसे मनाला दुःख फार ॥२॥
उच्च जीवनाची साधना वेगळी । तुम्ही चालविली थट्टा सर्व ॥३॥
शुकदास म्हणे पत सांभाळावी । मनात असावी ध्येयनिष्ठा ॥४॥

(१३४)

शिखासूत्र त्याग विभूतीलेपन । संन्यास लक्षण केले जरी ॥१॥
मुंडन करूनी नेसल्याने लुंगी । दिसेल बैरागी बाह्यरूपे ॥२॥
परी बाह्यत्यागे नव्हे उपयोग । विषयाचा त्याग मूळी व्हावा ॥३॥
शुकदास म्हणे जरी केले सोंग । अंतरीचे भोग धाव घेती ॥४॥

(१३५)

काही मर्यादेच्या पार गेल्यावरी । पंथ मते सारी एक होती ॥१॥
सर्वांचे एकचि उद्दिष्ट अंतीम । त्यामुळे संगम होत असे ॥२॥
कसेहि येवोत कोण्याहि मार्गांनी । अनुभववाणी सारखीच ॥३॥
शुकदास म्हणे उच्च थरावर । सर्व होती थोर समध्येयी ॥४॥

(१३६)

हाडाचा सापळा मांसाने लिपला । कातडयाचे त्याला आवरण ॥१॥
आंतूनी आतडे घाण चहूकडे । वरून कपडे गुंडाळले ॥२॥
एका आत्म्यामुळे अस्तित्व देहाला । आली असे त्याला सुंदरता ॥३॥
शुकदास म्हणे देह आत्म्यावीण । सडून कूजून नष्ट होय ॥४॥

(१३७)

बाह्य परिस्थिती दूषित बनली । त्यामुळे नासली सर्व मने ॥१॥
दुबळे नेभळे होऊन बसले । म्हणूनि मुकले सत्य सुखा ॥२॥
कोणीहि पाहावा अशांत दिसतो । रडत बोलतो काहीतरी ॥३॥
शुकदास म्हणे झाले विस्कळीत । अनीति माजत चाललीसे ॥४॥

(१३८)

रक्त नासलेले मेंदू कुजलेला । देहाने दुबळा काय कामी ॥१॥
पाऱ्यासम रक्त स्नायू लोखंडाचे । हवे पोलादाचे ज्ञानतंतू ॥२॥
अशा या शरीरी वज्रा ऐसे मन । तयाचे जीवन धन्य धन्य ॥३॥
शुकदास म्हणे असे बनण्यास । पाहिजे विश्वास आत्म्यावरी ॥४॥

(१३९)

सोंगे ढोंगे करी भूलवी लोकाला । सांगतो ज्ञानाला पोटासाठी ॥१॥
"भोगू नका त्यागा" कृतीवीण बोले । करीती हे चाळे भोगास्तव ॥२॥
विषयी आसक्त असूनि आपण । निर्लज्ज होऊन ज्ञान सांगे ॥३॥
शुकदास म्हणे अधिकारावीण । व्यर्थच बोलून काय लाभ ॥४॥

(१४०)

पत्निपुत्रासाठी अर्पूनी जीवन । गुलाम होऊन बनलासी ॥१॥
आता तरी वेडया येई भानावर । विवेक विचार कर काही ॥२॥
अमूल्य जीवन मातीमोल केले । तारुण्य टाकले गमावून ॥३॥
शुकदास म्हणे अलिप्त होऊन । स्थिर करी मन देवापायी ॥४॥

(१४१)

आपण आपली करीतो फिकीर । हेचि भयंकर पाप कर्म ॥१॥
स्वार्थीपणासम नाही दूजे पाप । त्याचा व्हावा लोप सत्कर्माने ॥२॥
शुद्ध चित्तामध्ये प्रगट तो शिव । आहे अनुभव साधकांचा ॥३॥
शुकदास म्हणे निस्वार्थ होऊन । अर्पावे जीवन परहिता ॥४॥

(१४२)

कर्म करण्याचा तुला अधिकार । कर्म फलावर इच्छा नको ॥१॥
निषिद्ध ते कर्म करू नको कधी । कर्तेपण आधी टाकी टाकी ॥२॥
निष्काम बुद्धीने स्वकर्म करून । करी ते अर्पण ईश्वराला ॥३॥
शुकदास म्हणे होऊनि सक्रीय । अलिप्तची राहे साक्षीरूपे ॥४॥

(१४३)

देवा धर्मावर आहे ज्यांची श्रद्धा । असे लोक सुद्धा स्वैराचारी ॥१॥
पाहून आश्चर्य वाटे मम मना । धार्मिक कोणाला म्हणू आता ॥२॥
धार्मिक लोकांनी असे केल्यावर । ठेवू मी विचार कोणापुढे ॥३॥
शुकदास म्हणे शोभेल ते करा । योग्य मार्ग धरा भाविकांनो ॥४॥

(१४४)

सेवाकार्या मध्ये येता स्वार्थ आड । होती डोईजड सर्व कामे ॥१॥
मिळतो आराम करूनिया काम । त्यासाठी निष्काम व्हावे लागे ॥२॥
लाचारी भीरुता स्वार्थामुळे येई । क्रियाशून्य होई मन त्याचे ॥३॥
शुकदास म्हणे सदा यशवंत । लोभ ज्या मनांत नाही नाही ॥४॥

(१४५)

विषय विकार बळी पडू नका । नाही तर धोका करतील ॥१॥
सावध रहावे सदा सर्वकाळ । असावे निश्चळ साधकाने ॥२॥
नका करू लाड इंद्रियांचे कधी । ताब्यामध्ये आधी ठेवा त्यांना ॥३॥
शुकदास म्हणे करूनि साधन । मनात वासना राहू नये ॥४॥

(१४६)

इंद्रिय मनाचा निग्रह करूनि । मग साधकांनी पुढे जावे ॥१॥
स्वैर वर्तनाचा केल्यावीण त्याग । न साधे तो योग कोणालाही ॥२॥
संयमी नियमी असल्याशिवाय । यशस्वी न होय योगमार्ग ॥३॥
शुकदास म्हणे शास्त्रोक्त वागाल । सुलभ सरळ सर्व काही ॥४॥

(१४७)

जिव्हाळ्याशिवाय केलेल्या कर्मानि । नाही होणे जाणे काही एक॥१॥
ओतोनिया प्राण करी जो कर्मास । नसे अपयश त्याला कधी ॥२॥
तळमळीवीण नव्हे खरी सेवा । उगीच देखावा काय कामी ॥३॥
शुकदास म्हणे स्वार्थीपणामुळे । येती अडथळे सेवेमध्ये ॥४॥

(१४८)

एक वेळ तरी करा हा विचार । आहे सूत्रधार कोण याचा ॥१॥
कोण हे हालवी सूत्र जगताचे । की जेथे कोणाचे चालेनाचि ॥२॥
असा कोण आहे त्याचा शोध करा । तेव्हांच हा फेरा बंद होय ॥३॥
शुकदास म्हणे मुळीचा विचार । करूनिया थोर मुक्त झाले ॥४॥

(१४९)

तुमच्या मनांत आहे तळमळ । परंतु गोंधळ झाला असे ॥१॥
कारण प्रत्यक्ष करावया कृती । निःशंक ही वृत्ती झाली नाही ॥२॥
म्हणून सक्रीय निर्भय होऊन । त्वरीत उठोन काम करा ॥३॥
शुकदास म्हणे असू द्या चिकाटी । होईल शेवटी इच्छा पूर्ण ॥४॥

(१५०)

भक्ती प्रेमासाठी नको काळ वेळ । शुद्ध तळमळ असू द्यावी ॥१॥
सदैव करावे देवाचे चिंतन । यावीण साधन सोपे नाही ॥२॥
सर्वांभूती देव पाहाया शिकावे । सर्वस्व अर्पावे देवासाठी ॥३॥
शुकदास म्हणे नगण्य राहून । करावे प्रयत्न अहर्निश ॥४॥

(१५१)

अधून मधून येतो असा काळ । मीटती सकळ भेदभाव ।।१।।
बहुमते जाती होते एक मत । पुन्हा द्वैत मत वाढो लागे ।।२।।
त्यामुळे नेहमी विभन्नता राहे । अशी चालताहे परंपरा ।।३।।
शुकदास म्हणे होतसे प्रगती । ज्यावेळी असती बहू मते ।।४।।

(१५२)

तुम्ही आम्ही एक कशाला भांडता । प्रेमाने बोलता काय नाशे ।।१।।
अनेक शरीरे एकच आकृती । व्यर्थपणे चित्ती भेदभाव ।।२।।
एकमेकावरी करूनिया प्रेम । करू स्वर्गसम सर्व येथे ।।३।।
शुकदास म्हणे किती हा आनंद । गेल्यावरी भेद मनातूनि ।।४।।

(१५३)

कोणी कोणत्याहि धर्मांचे असावे । परंतु राहावे एकत्रीत ।।१।।
धर्म हा असूनि सर्वांचा सारखा । तुच्छ एकमेका लेखूं नये ।।२।।
उद्दिष्ट एकचि साधने पुष्कळ । म्हणूनि गोंधळ होऊ पाहे ।।३।।
शुकदास म्हणे वेगळ्या मार्गांनी । एकाच ठिकाणी जाऊ सारे ।।४।।

(१५४)

तुमची आमुची ओळख पहिली । म्हणूनिया झाली भेट आता ।।१।।
मागील जन्मीच्या संबंधा शिवाय । कोणाचे न होय कोणी मित्र ।।२।।
अनेक ठिकाणी विखुरल्या गेलो । पुन्हा एक झालो सर्व आता ।।३।।
शुकदास म्हणे असतील कोणी । येतील धाऊनि लवकर ।।४।।

(१५५)

संत संगतीने झालो मी सावध । सत्यासत्य बोध कळलासे ।।१।।
योग्य मार्ग त्यांनी मज दाखविला । त्यामुळे सुखाला पार नाही ।।२।।
नाही तर आज असतो गुंतून । उपाध्या निर्मून असंख्यात ।।३।।
शुकदास म्हणे संत कृपा झाली । म्हणूनि लाभली ज्ञान दृष्टी ।।४।।

(१५६)

कितीहि विरोध केला जरी तुम्ही । तरी करू आम्ही योग्य तेचि ॥१॥
देवाची आम्हांला दाखवितो वाट । म्हणूनिया धीट झालो आम्ही॥२॥
त्यामुळे कोणाचे काहीच चालेना । हटवू शकेना कोणी आता ॥३॥
शुकदास म्हणे करू सेवा भक्ती । नाही आम्हा भीति कोणाचीच ॥४॥

(१५६)

आमुचा भारत आम्हां तीर्थासम । येथे अनुपम सर्व काही ॥१॥
आम्हा साठी येथे सर्वांची शरीरे । आहेत मंदीरे ईश्वराची ॥२॥
शुकदास म्हणे या मंदीरातील । देवास भजेल तोचि मुक्त ।३॥

(१५७)

मुक्त झाल्यावर नाही पुण्यपाप । होय सुखरूप पुनरपि ॥१॥
देहात असूनि मुक्तची केवळ । देहाचिही खोळ पडो कधी ॥२॥
शुकदास म्हणे मुक्ताचे लक्षण । मुक्तचि होऊन ओळखावे ॥३॥

(१५८)

आत्म्याव्यतिरिक्त सत्य वस्तु नाही । असा येता पाही अनुभव ॥१॥
मग ते करीना संकल्प विकल्प । जाय आपोआप स्थिरावूनी ॥२॥
जळणा अभावी जैसा अग्नी शांत । होय तद्वत मनस्थिती ॥३॥
ग्राह्य अशी वस्तू राहतचि नसे । त्यामुळे होतसे मनामन ॥४॥
शुकदास म्हणे आत्मारूपी लीन । झाल्यावरी मन मन कैसे ॥५॥

(१५९)

मुळांत तू आहेस निःसंग अकर्ता । देहासंगे भोक्ता मानीतसे ॥१॥
मानीतसे जड देह मीच आहे । कर्ता भोक्ता होय नसताचि ॥२॥
नसताचि तुज झाला असे भ्रम । असूनिया ब्रह्म भेद वाटे ॥३॥
भेद वाटे तुज अभेद असता । वाढली अहंता देहा संगे ॥४॥
शुकदास म्हणे स्वयं ब्रह्म तूचि । भूलला व्यर्थची अभिमाने ॥५॥

(१६०)

तेच तूं आहेस म्हणून होशील। स्वरुपी अचल पुनरपी ॥१॥
असे असतांना टाकी भेदभाव। घेई अनुभव एकत्वाचा ॥२॥
त्यासाठी पाहिजे आधी आत्मज्ञान। नकळे एकूण नाही तर ॥३॥
शुकदास म्हणे गुरूविण ज्ञान। कळून करणे शक्य नाही ॥४॥

(१६१)

देव ह्या जगात सर्व वस्तु आत। परंतु देवात जग नाही ॥१॥
कारण जगाशी अस्तित्वच नाही। विश्वरूपे पाही तोचि आहे ॥२॥
तोचि वस्तु आत तोचि वस्तुरूपे। तोचि पुन्हा व्यापे कोणामध्ये ॥३॥
शुकदास म्हणे जगदेव एक। आम्हांसी ठाऊक झाले असे ॥४॥

(१६२)

आश्रम धर्माचे देहाला बंधन। आत्मा त्यापासून वेगळाचि ॥१॥
आत्म्याची न होय सुंता मौंज काही। असती सोंगे ही देहाचीच ॥२॥
देहासाठी सर्व संयम नियम। परी आत्माराम अलिप्तची ॥३॥
शुकदास म्हणे आत्मा सर्व काल। असंग निर्मळ राहतसे ॥४॥

(१६३)

श्रद्धावान लोक होय ज्ञान प्राप्त। सांगताती संत वेळोवेळी ॥१॥
वेळोवेळी हेचि सर्वांस सांगती। नव्हे मोक्षप्राप्ती श्रद्धेवीण ॥२॥
श्रद्धेवीण काय करूनी श्रवण। जाळावे मनन काय कामी ॥३॥
शुकदास म्हणे ज्ञान ते अज्ञान। श्रद्धायुक्त ज्ञान जेथे नाही ॥४॥

(१६४)

खाण्यापिण्यातील सुखापेक्षा जास्त। आनंद ज्ञानात किती तरी ॥१॥
फक्त याच जन्मी मिळविता येतो। जीव हा मुकतो बाकी जन्मी ॥२॥
म्हणून विषय सारून बाजूला। मिळवू ज्ञानाला एकनिष्ठे ॥३॥
शुकदास म्हणे सर्वश्रेष्ठ सुख। ज्ञानातून देख प्राप्त होय ॥४॥

(१६५)

भक्ती वैराग्य हे जिचे दोन्ही तीर। मध्ये ज्ञान नीर वाहतसे ॥१॥
अशी ज्ञान गंगा जिचे होता स्नान । निघती धुऊनि मल सर्व ॥२॥
अविद्या कल्पना मळाचाही मळ। जाऊनि निर्मळ राहतसे ॥३॥
शुकदास म्हणे त्रिवेणीसंगम। तीर्थची उत्तम सर्वासाठी ॥४॥

(१६६)

वैराग्याची रेती ज्ञानाचे सिमेंट। पावित्र्याची वीट नीट असे ॥१॥
बांधकाम शक्य होईना तरीही। भक्ती पाणी नाही म्हणूनिया ॥२॥
रेती पाणी वीट सिमेंटाशिवाय । सर्व व्यर्थ होय एकाविण ॥३॥
शुकदास म्हणे ध्येयाचे शिखर। होईल तयार मिश्रणाने ॥४॥

(१६७)

साधुसंत काय सांगूनिया गेले। पाहिजे कळले आपणाला ॥१॥
आपुल्या हिताचा केला उपदेश । पडू द्या प्रकाश डोक्यामध्ये ॥२॥
देऊ जीवनाला वेगळे वळण । स्वहीत करून घेऊ आता ॥३॥
शुकदास म्हणे अमृत वाणीने। अमर तयाने केले मला ॥४॥

(१६८)

सुशील आपुले जीवन असावे। तेंव्हा अनुभवे येथे स्वर्ग ॥१॥
मने खंगलेली बुद्धी जंगलेली। पुढे चढलेली कुकर्माची ॥२॥
अशा ह्या लोकांना वाटते भयाण। जगचि स्मशान भासतसे ॥३॥
शुकदास म्हणे असावे निर्मळ। होते अनुकूल भोवताली ॥४॥

(१६९)

एकाच देवाची लेकरे आपण। आहोत म्हणून भाऊभाऊ ॥१॥
किती हे सुंदर आपुले संबंध। मिथ्या जाती भेद वाढविला ॥२॥
यापेक्षाहि सत्य नाते एकत्वाचे। जेथे बंधुत्वाचे व्यर्थ पण ॥३॥
शुकदास म्हणे तुमचाआमुचा । अनादी काळाचा योग आहे ॥४॥

(१७०)

तरुणानो यारे होऊ संघटीत । नीतीचे जगत आणू पुढे ॥१॥
राक्षसी वृत्तीला सामना देऊन । करूया स्थापन रामराज्य ॥२॥
आजच्या जगात माणूस दुर्मिळ । त्याचाच दुष्काळ पडलासे ॥३॥
शुकदास म्हणे पशूपार्टीवाले । वाढून राहले असंख्यात ॥४॥

(१७१)

कसेहि करूनी चला एक वेळ । मिळूनी सकळ समध्येयी ॥१॥
खेडे विभागांत जाऊन आपण । पाहू जवळून दु:खितांना ॥२॥
काय त्यांची स्थिती काय त्यांना संधी । पाहू या संबंधी निरक्षून॥३॥
शुकदास म्हणे येता का आपण । करू या पाहून काही तरी ॥४॥

(१७२)

गीता भागवत लोकांना सांगती । आपण वागती भेद युक्त ॥१॥
अशा ह्या लोकांच्या बोलण्यापासून । न होय कल्याण कोणाचेही॥२॥
शब्दाचा प्रभाव तेंव्हाच पडतो । अनुभवे येतो अधिकार ॥३॥
शुकदास म्हणे जवळी कल्पना । व्यर्थची वल्गना काय कामी ॥४॥

(१७३)

कुटील लोकांशी नाही समाधान । मनीं रात्रंदिन जळताती ॥१॥
मनांत नेहमी कुतर्क कल्पना । कोणाचे दिसेना बरे त्यासी ॥२॥
कांहीच चांगले केंव्हाच दिसेना । म्हणून सूचेना निंदेवीण ॥३॥
चित्तते मलीन मनते अस्थिर । त्यामुळे अंतर दुखविती ॥४॥
शुकदास म्हणे अशा ह्या लोकांशी । कधी सहवासी ठेवूं नये ॥५॥

(१७४)

दुसऱ्याचे रक्त पिणाऱ्या लोकांची । संख्या वाढतचि चाललीसे ॥१॥
त्यामुळे लोकांत स्थिरता असेना । सुखाने लागेना झोप कोणा ॥२॥
चंदनासारखे झिजणारे लोक । जन्मोत अनेक घरोघरी ॥३॥
शुकदास म्हणे ढेकूणप्रवृत्ती । दूषित करती समाजाला ॥४॥

(१७५)

कोटयावधी मूर्ति करून घेतल्या । सर्व बसविल्या मंदिरात ॥१॥
विधीयुक्त पुजा करून तयांची । स्थिरता मनाची झाली नाही ॥२॥
कारण नव्हती चित्ती तळमळ । त्यामुळे निष्फळ गेले सर्व ॥३॥
शुकदास म्हणे बाहेर देखावा । आतूनि वणवा लागलासे ॥४॥

(१७६)

किती कासाविस होशी दान देता । लोका बुडविता सुख वाटे ॥१॥
थोडातरी कर दान धर्म काही । उपभोग घेई संपत्तीचा ॥२॥
आडमार्गे खर्च होतो तुझा फार । मिळेना भाकर गरीबाला ॥३॥
शुकदास म्हणे संग्रह करून । समाजा सोडून खाऊ नको ॥४॥

(१७७)

देवधर्मासाठी आमुचे जीवन । घेतले वाहून कायमचे ॥१॥
तसेच हो आम्ही मातृभूमीवर । करितो अपार प्रेम सुद्धा ॥२॥
याशिवाय बाकी माहित असेना । गरज दिसेना कशाशीच ॥३॥
शुकदास म्हणे तोचि देव भक्त । होतो देशभक्त खरोखर ॥४॥

(१७८)

मला जीभ नाही असे जी बोलतो । तद्वत म्हणे तो देव नाही ॥१॥
देव नाही म्हणे तोचि कसा आहे । विचारूनी पाहे मनामाजी ॥२॥
तो आहे म्हणून आपण बोलतो । बोलून म्हणतो देव नाही ॥३॥
शुकदास म्हणे सर्वांचा आधार । विश्वास त्यावर ठेवा आधी ॥४॥

(१७९)

घड्याळाजवळ ठेविता चुंबक । काटे तो अचूक बंद पाडी ॥१॥
नारीपुत्रामुळे असेच घडते । प्रगती थांबते साधकाची ॥२॥
देवावीण कोणी न राहावे मनी । संसारापासूनि तेंव्हामुक्ती ॥३॥
शुकदास म्हणे परीसा स्पर्शून । सुवर्ण होऊन रहा त्यात ॥४॥

(१८०)

पूर्व कर्मांमुळे साधन मार्गात । येती असंख्यात अडथळे ॥१॥
पूर्व जन्मावर येते आधारीत । तसेच घडत अनायसे ॥२॥
मागील जन्माचा प्राप्त जीवनाशी । संबंध कर्माशी येत असे ॥३॥
शुकदास म्हणे ईश कृपेमुळे । दैव पालटले पुष्कळांचे ॥४॥

(१८१)

दहा वाटसरू प्रवासा निघाले । नदीपार गेले तरूनिया ॥
तरूनिया नदी आले पैल तीर । करती विचार सर्वजण ॥
एक म्हणे एका मोजोनिया पाही । आलो किंवा नाही दहाजण ॥
दहाजण होते दहावा मोजीत । आपणा सोडीत वेळोवेळी ॥
वेळोवेळी एक रहातसे कमी । तेणे चित्त भ्रमी झाले त्यांचे ॥
झाले ते भ्रमिष्ट करती आरोळा । दहावा बुडाला नदीमध्ये ॥
नदीमध्ये मेला म्हणून रडती । नावाडी पाहती भ्रम त्यांचा ॥
भ्रम त्यांचा दूर करावा म्हणूनी । नावाडी येऊन बोलतसे ॥
बोलतसे त्यांना आहे आहे गडी । टाकू नका उडी नदीमध्ये ॥
नदीमध्ये नाही, आहे तो बाहेरी । सांगता अंतरी खूष झाले ॥
खूष झाले सर्व आहे तो आम्हांत । परोक्षाची वार्ता ऐकताचि ॥
नाही तोचि असे ज्ञान हे परोक्ष । परंतु प्रत्यक्ष भेट नाही ॥

मग तो नावाडी येऊन जवळ । उठवी सकळा उभे करी ॥१॥
करूनिया उभे मोजून दावीत । दहावा म्हणत तो मी असे ॥२॥
तो मी असे हेचि ज्ञान अपरोक्ष । कारण प्रत्यक्ष तोचि होता ॥३॥
शुकदास म्हणे सद्‌गुरूवीण । अपरोक्ष ज्ञान नव्हे कदा ॥४॥

(१८२)

सिद्धी प्रसिद्धीच्या मोहांत पडून । झाले नुकसान अनेकांचे ॥१॥
नारी धना पायी लोक वेडावले । धुळीत मिळाले सत्तेसाठी ॥२॥
विकार बेकार करून टाकती । त्यामुळे प्रगती थांबतसे ॥३॥
शुकदास म्हणे आधीच फसले । त्यामुळे राहिले काम बाकी ॥४॥

(१८३)

हृदय ओतून कामाला लागाल । तरीच होईल परीपूर्ण ॥१॥
नका पाहू मागे येथे थांबू नका । पाऊले ही टाका पुढे पुढे ॥२॥
जरी परिस्थिती आहे प्रतिकुल । तरी सुटतील प्रश्न सर्व ॥३॥
शुकदास म्हणे निष्ठेने धैर्याने । करा चिकाटीने काम पूर्ण ॥४॥

(१८४)

तुम्ही तुमचेच करा निरीक्षण । दिसेल आतून घाण सारी ॥१॥
मल विक्षेपाने केली धुळधान । दोष आवरण मूळ त्यासी ॥२॥
वर वर चाले सोवळे ओवळे । कोण मनांतले पाहू शके ॥३॥
शुकदास म्हणे मनाचे विकार । नाहीत जाणार औषधाने ॥४॥

(१८५)

फुलें उमलावी तशीच असावी । भेटीत खुलावी मन कळी ॥१॥
फुलातून जसा सुगंध पसरे । तसेच हंसरे मुख हवे ॥२॥
फुलासम ज्यांचे मुलायम शब्द । दुसऱ्या आल्हाद देती सदा ॥३॥
शुकदास म्हणे असे फुललेले । धुंद ह्या जगाले बनविती ॥४॥

(१८६)

मन पुलकीत करणारा ध्वनी । येतसे जेथूनी तोचि संत ॥१॥
देव भक्त जेथे तेथे सुख शांती । मीळते विश्रांती भक्तापायी ॥२॥
संताचे सांगाती शांती मीळे जीवा । म्हणूनी करावा संत संग ॥३॥
शुकदास म्हणे संत हा प्रशांत । बनवी जगत भोवताली ॥४॥

(१८७)

खरट तुरट बोललो तुम्हाला । माफ करा मला एक वेळ ॥१॥
नंतर तुम्हाला सर्व समजेल । भावार्थ सरळ बोलण्याचा ॥२॥
सर्वांच्या हिताचा केला मी उच्चार। पुढचा विचार करुनिया ॥३॥
शुकदास म्हणे शेवटी कळेल । लक्षांत येईल सर्व कांही ॥४॥

(१८८)

स्फुरले तसेच लिहून काढले । चरणी अर्पीले ईश्वराच्या ॥१॥
कर्ता तोचि आहे पुढे केले मला । घेऊ मी कशाला मोठे पण ॥२॥
शुकदास म्हणे मी तर अलिप्त । परंतु निमित्य केले माझे ॥३॥

REFBK-0022510
REFBK-0022510 —

# आरती

आरती करू, ब्रह्मरुपाला । परमानंद स्व-स्वरुपाला ॥
निजरूपाला आरती करू, जय जय ब्रह्मरूपा ऽऽ ।।धृ.।।
अद्वैत अक्रीय शुद्ध मुक्ता, निर्गूण निराकार अव्यक्ता ।।
अनाम अरूपा स्वयं सिद्धा, आदी अंती तूचि संचला ।। आरती
अनागी अव्यय जगन्नाथा, स्वयं प्रकाशा सदोदिता ।।
स्वयंभू अलक्षा परेपरता, सांगीतसे तोचि हा वार्तेला ॥ आरती
अपारा अमुपा परात्परा, परम पुरुषा सर्वेश्वरा ॥
शुकदास म्हणे तो मी खरा, माझ्या मी करीतो आरतीला ॥आरती

□ □ □

जगद्‌गुरू स्वामी विवेकानंद की जय
भारत माता की जय . . .

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठा
2358
वा. क्र.
22490 काव्य
ग्रंथ शाखा